महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: सीबीटी-०६२२/प्र.क्र.११/२०२२/३१ दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :**-दिव्यांग व्यक्तींना परीक्षेच्यावेळी सहायक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार संगणक प्रणालीवर आधारित परीक्षा देण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे सहायक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी सहायकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातींस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व सहायकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह **so-vpr@mpsc.gov.in** या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | जाहिरात क्रमांक | परीक्षेचा दिनांक | विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-अ | २०/२०२२ | १७ मार्च, २०२३ | ०९ मार्च, २०२३ |
| २ | कनिष्ठ भूवैज्ञानिक (तांत्रिक सेवा), गट-ब | ८४/२०२२ | | |
| ३ | सहायक (विधी), गट-ब (अराजपत्रित) | ९२/२०२२ | | |
| ४ | उप अभियांता (विद्युत व यांत्रिकी), महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-अ | ८१/२०२२ | २० मार्च, २०२३ | |
| ५ | कार्यकारी अभियंता (विद्युत), महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-अ | ८९/२०२२ | | |

**३.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई